शहरी शेती प्रयोग

Deborah Dutta

पर्यावरण बदलाच्या परिपेक्षेमध्ये तसेच मोठ्या प्रमाणात होणाऱ्या औद्योगिकरणामुळे एका बाजूने उत्पादक जमिनीचा ऱ्हास होत असताना अन्नधान्याचे 'उत्पादन व वापर' या संदभात शहरी उपलब्ध जागेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. शहरी भागातील सामूहिक शेतीचे प्रयोग शहरात राहणाऱ्या लोकांमध्ये शेती, जमीन, शेतकरी, पर्यावरण व्यवस्था इ. बाबतीत जाणीव निर्माण करणे व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत.

जगातील जवळपास अर्धी लोकसंख्या शहरात राहते. गेल्या शतकातील शहरीकरणाचा अभूतपूर्व वेग हा एकंदर पर्यावरणाच्या मोठ्या ऱ्हासास कारणीभूत ठरला आहे. या शहरीकरणाच्या इतर परिणामासोबतच अन्नसुरक्षा, ग्लोबल वॉर्मिंग, जलवायू बदल, हवेतील प्रदूषण, जंगलाचा ऱ्हास, मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा व वापर अशा प्रकारचे अनेक विपरीत परिणाम झालेले दिसतात. अशा प्रकारे जो शहरीकरणाचा ओघ वाढत आहे त्यामध्ये आपण कशा प्रकारचा हस्तक्षेप करणार व आपण अशा शहरामध्ये कसे राहणार यावर एकंदर शाश्वती निर्भर राहणार आहे.

शहरी शेती सामूहिक पद्धतीचे व्यासपीठ

अन्न सुरक्षा व उत्पादन यांचा शहरीकरण व त्यासंबंधित पर्यावरणीय समस्या यांचा फार जवळचा संबंध आहे पण तो सहजपणे दिसत नाही. शहरी जागा या सहसा शेतीच्या जागेपासून दूर असतात. त्यांच्यासाठी लागणाऱ्या अन्नाची नियमितपणे हजारो किलोमीटर वाहतूक विविध मध्यस्थांच्या मार्फत करावी लागते. ज्यामुळे खर्चासोबत अन्नाचे पर्यावरण प्रदूषण वाढते.

अन्नधान्याची ही पणन व पुरवठा व्यवस्था शेतकऱ्यांसाठीही शोषक ठरते. अलीकडच्या काळात एक मनोरंजक विरोधाभासी बाब दिसून येत आहे. भारतामध्ये लहान प्रमाणात असेल परंतु लक्षात येण्याजोगा लोकांचा कल दिसून येत आहे. ज्यामध्ये लोक कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी सोडून शेतीमध्ये आपला व्यवसाय करू इच्छित आहेत. याला विविध कारणे आहेत. पण त्यासोबत अन्नसुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वती हे प्रमुख कारण ठरत आहे. अर्थात याचा कल पर्यावरणीय शेतीचा शोध घेणे व त्याचे पुनरुज्जीवन करणे हा प्रवाह पर्यावरणीयदृष्ट्या याकडेच झुकतांना दिसतोय. त्या मागे पारंपारिक शेती पद्धतीला उजाळा देणे असा कल दिसतोय. हा लेख अशाच एका सामुदायिक शहरी शेतीच्या सामुदायिक प्रयोगावर आधारित आहे.



प्रेमिला आपल्या घराच्या गच्चीवरच्या परसबागेतुन कारल्याचे पीक घेतांना

ड्रीम ग्रोव सामुदायिकपणे तयार केलेला शहरी फार्म ड्रीम ग्रोव हा शहरी शेतीचा मुंबईच्या सार्वजनिक बगीच्यातील ८०० चौ. फूट जागेत स्थापन केलेला उपक्रम आहे. उद्यानाच्या पूर्वीच्या दुर्लक्षित स्थितीमुळे स्थानिक रहिवासी मारी पॉल यांनी त्याचे लहान मुले व वृद्धांसाठी अधिक चांगल्या स्वरूपात रूपांतर करण्याचे २०१८ पासून प्रयत्न केले. त्यांनी ऐच्छिक पद्धतीने बगीच्याची देखभाल करण्यासाठी स्थानिक रहिवाश्यांचा एक गट तयार केला.

त्या गटातील प्रमिला मार्टिस व दिप्ती झांगियानी या दोघींना 'अर्बन लिव्हज्' या शहरी शेती गटाचे स्वयंसेवक म्हणून खाद्य वनस्पती लावण्याचा पुर्वानुभव होता. मार्टिसने सर्वांना शेजारी पडलेल्या पानांचा कचरा, स्वयंपाक घरातील कचरा आणि नारळाचा भुसा जमा करण्यास सांगितले. त्याचे बगीच्यात ढीग करून गायीचे शेण व गोमूत्राचा वापर करून कंम्पोस्ट करण्याच्या कामात पुढाकार घेतला. याला अमृत मिट्टी तयार करण्याची प्रक्रिया असे म्हणतात. अशा प्रकारे अन्न घटकांनी भरपूर समृद्ध अशा मातीतील सेंद्रीय पदार्थाचा वापर सेंद्रीय फळे व भाजीपाला लागवडीसाठी केला होता. सुरुवातीला बृहन मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशन हे या संकल्पनेबाबत साशंक होतो. परंतु स्थानिकांचा प्रतिसाद व जागेचे बदललेले भौतिक स्वरूप पाहून ते त्यांना मदत करण्यासाठी व बगीच्याच्या देखभालीसाठी तयार झाले. आता त्यांनी या उपक्रमात समुदायाने तयार केलेल्या अन्न बागेत खर्च करीत आहेत.

झांगियाती यांच्या मते, गेल्या दोन वर्षात त्यांनी ५० पेक्षा जास्त प्रकारच्या खाद्य वनस्पती ज्यामध्ये फळे, भाज्या व औषधी वनस्पती लावल्या. हंगामी उत्पादने ज्यामध्ये अननस, केळी, सुरण, मुळा, टोमॅटो, कारली, मिरची व भेंडी इत्यादीचा समावेश आहे. मार्टिन यांच्या मते, सर्वात महत्त्वाचे म्हणजे कम्पोस्टिंग खुरपणी, पिकांचे संरक्षण इत्यादी कामात लोकांच्या शारीरिक सहभागामुळे त्यात अन्न पिकविण्याच्या प्रक्रियेला अधिक जवळून समजण्यात मदत झाली. ७० ते ८० वर्ष वयोगटांच्या लोकांच्या सहभागामुळे आंतरपिठीय सामंजस्य आणि संवादाचे नवीन रूप प्राप्त झाले. अंदाजे २० डीजी स्वयंसेवक आठवड्याच्या शेवटी बगीच्याला भेट देवून बीन झाडे लावणे, मालाची तोडणी, पाणी देणे इ. कामे करीतात. त्यांच्या शब्दात (श्रीमती मार्टिन), ''जेव्हा तुम्ही स्वत: अशा कामात सहभागी असता तेव्हा तुम्हाला अशा प्रयत्नांचे महत्त्व समजते. आम्ही नुसते झाडे वाढवित नसून आम्ही मानवी समाज म्हणून वाढत आहोत.''

या गटाने आपल्या कामाचा विस्तार जवळच असलेल्या शेतकरी बाजाराशी सेंद्रीय बियाणे मिळविण्यासाठी व बाजारात दिवसाकाठी उरलेला माल व कचरा कम्पोस्टिंगसाठी गोळा करण्यासाठी केला. अन्नधान्याच्या व्यवस्थेबद्दलची त्यांची वाढती आवड आणि चिंता यामुळे प्रेमिला यांनी 'बांद्रा घरासाठी उत्पादक' (Growers to Bandra Homes) या गटाची स्थापना लॉकडाउनच्या काळात केली. ज्यामध्ये त्यांनी शेतकरी किंवा शेतकऱ्यांच्या सक्रियपणे माल एकत्र करणारे यांच्याकडून थेट माल घेणे सुरू केले. हळूहळू हे नेटवर्क वाढत चालले आहे. कारण गटातील इतर सदस्यांनी शेतकऱ्यांची जास्तीत जास्त उत्पादनाची माहिती मित्रांना व कुटुंबांना देणे सुरू केले आहे.

लॉकडाउन दरम्यान विश्वासाचे नेटवर्क तयार करणे

प्रेमिला मार्टिस गेल्या काही वर्षापासून काही सेंद्रीय शेतकऱ्यांपासून तांदूळ व धान्य मागवित होत्या. त्यांनी (ग्रोअर टु बांद्रा होम) नावाने एक ऑनलाईन व्हॉटस्ॲप ग्रुप तयार करण्यासाठी पुढाकार घेतला. ज्यात शेतकरी आपल्या उत्पादनाची माहिती उपलब्ध करू शकत होते. त्यांच्या मते, शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीमुळे विश्वास निर्माण होऊन त्यांच्याशी जोडण्याची भावना तयार होण्यास मदत झाली.

अनुभवावर आधारित शहरी ग्राहकांच्या संवेदना जागविल्यामुळे शाश्वत शेती करण्याच्या प्रयत्नांना मागणी आणि समर्थन मिळू शकते.

अमृत मिट्टी ही वाळलेला बायोमास कुजवून तयार केली जाते. ज्यामध्ये बहुतांश वाळलेली पाने ही अमृत जल, जे मिश्रण पाणी, गोमूत्र, शेत व सेंद्रीय काळ मूळ वापरून तयार केले जाते. हे वापरून लवकर कुजविल्या जाते.

उदाहरणार्थ या शेतकऱ्यांपैकी एक शेतकरी सुशील बोरकर आहे. ज्याने आपला माल गटावर विकला. ते व्यवसायाने जरी व्यवसायिक असले तरी त्यांचा जास्त ओढा जमिनीकडे आहे व ते काम दर आठवड्याच्या शेवटी करतात. असे गेल्या ३० वर्षापासून ते करीत आहेत. ते आपल्या निसर्गावरील प्रेमाचे श्रेय भारतीय तंत्रज्ञान संस्थेतील (IIT-Indian Institute of Telecom) वन्यजीव क्लबमध्ये सहभागी होण्याच्या अनुभवाला देतात. ते कोणतेही रासायनिक खते वा किटकनाशक वापरत नाहीत आणि अशा शेतातील पर्यावरणामध्ये विकसित होत असलेल्या अन्नाची त्यांना जाणीव आहे. त्यांनी आपल्या उत्पादनाची माहिती ग्रुपवर खालीलप्रमाणे टाकली.

''सर्वांना सांगण्यास आम्हाला आनंद होत आहे की आम्ही या आठवड्यात आमचा शेतमाल पुरविण्याचे नियोजन करीत आहोत आणि पद्मश्री सुभाष पाळेकरांचे नैसर्गिक शेती तंत्र वापरत आहोत, ज्यात शेणापासून तयार केलेले घनामृत व जिवामृत वापर केल्या जाता. जे बनविण्यासाठी आमच्याकडे आता १८ देशी जनावरे (गायी, सांड व गोऱ्हे) आहेत व आम्ही कधीही गायींचे दूध काढत नाही. आमची सर्व उत्पादने हे १०० टक्के एसपीएनएफ (नैसर्गिक सेंद्रीय) आहेत.''

आमचे आंबे तीन वाणांचे उपलब्ध आहेत. हापूस (८० टक्के आमच्या एकूण आंबा पिकांपैकी), रत्ना (१० टक्के, केशर (१० टक्के). आंबे हे शेवटच्या वेळेस ते पूर्णपणे झाडांवर पक्व झाल्यानंतर काढतात. त्यानंतर धानाच्या तणसात पिकायला ठेवतात. आंबे पूर्ण/अर्ध पिकलेल्या अवस्थेत पुरविल्या जातात. कमीत कमी ८ डझनची मागणी आंब्याच्या आकार १/१ राहू शकतो.

ग्राहकांद्वारे एखाद्या शेतकऱ्यांकडून केलेल्या मालाच्या खरेदीचा व वापराचा अनुभव, त्याचा वापर लोकप्रिय किंवा त्याच्या वापराबाबत जागृती करण्यासाठी ग्रुपवर टाकला जातो. दीप्ती यांच्या मते, वेगवेगळ्या हंगामात झाडांवर येणाऱ्या फळांचा अनुभव त्यांना एका विशिष्ट महिन्यात काय उपलब्ध होईल हे समजण्यास व त्याचा आनंद घेण्यास मदत होते.

स्थानिक उत्पादनांचा पुरवठा करण्यास मदत करण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यात सक्रिय सहभाग

गटातील सदस्यांनी शेतकऱ्यांकडून सर्व माल विकत घेवून त्याचे वाटप करण्याची जबाबदारी घेतली. कारण त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतातून शहरात माल आणण्याचा खर्च वाचू शकतो. व्यक्ती नुसत्या माल घेणाऱ्या न राहता त्यांना मालाची मालकी व शेतकऱ्यांविषयी सहानुभूती वाटते. उदाहरणार्थ गटांनी एकत्र येवून कांदे व फळे

वेगवेगळ्या शेतकऱ्यांपासून खरेदी केले व त्यांचे त्यांनी आपआपसात वाटप केले. असे म्हणता येणार नाही की सर्व वितरण हे नियोजन केल्याप्रमाणे होईल आणि कधी कधी उत्पादनाचा पुरवठा व त्यांची गुणवत्ता राखणे कठीण राहील. तरीही प्रेमिला यांनी शेतकरी व माल एकत्र करणारे यांच्याशी ग्राहकांचा संपर्क करण्यासाठी पुढाकार घेतला. कारण त्यामुळे अन्नाच्या विविधतेविषयी अधिक तपशिलांमध्ये शिकता येत होते. त्यांनी असे सांगितले की, गटातील इतर सदस्यांनाा ही माहिती दिल्याने त्यांचा अन्नधान्याच्या निवडीमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास मदत झाली.

अभिप्राय व सशक्तीकरणाचे चांगले चक्र

शेतकऱ्यांद्वारे सतत झालेल्या संवाद व दिलेल्या अभिप्रायामुळे गटांचे त्यांच्या पसंती व सामूहिक प्रयत्नांना एक ताकत मिळाल्याचे जाणवले. ''आमच्यापैकी ज्यांनी कांदे आणले त्या अमित यांना पुष्कळ धन्यवाद ज्यांनी कांदा उत्पादक शेतकरी आणि यांच्याशी समन्वय साधला. पोहचविण्याची व वितरणाची व्यवस्था केली. तुमच्या माहितीकरिता आणि व त्याच्या शेजारच्या शेतकऱ्यांजवळ सहा टन उन्हाळी कांदा होता व त्यांनी तो कमी किंमतीला व्यापाऱ्यांना देण्यास नकार दिला व स्वत: तो मुंबईला पुरविण्याचे ठरविले. मागील आठवड्यात त्यांनी १५०० किलो पाठवला. आम्ही त्यातील १०० किलोचा लहान भाग घेतला पण त्यात आनंद वाटला.'' गटाद्वारे अतिशय लहान उत्पादकांना (जसे – नारळ, लोणची इ.) आधार दिला गेला. ज्यामुळ मोठ्या प्रमाणात स्थानिक पुरवठा साखळी निर्माण झाली.

पुढचा मार्ग: स्थानिक प्रयत्नाद्वारे शेतकरी उत्पादनास प्रोत्साहन

माहिती व उदाहरणाने असे दर्शविले की शहरी शेतीविषयक उपक्रमांमध्ये गट सदस्याचा निरंतर सहभाग असल्यामुळे त्यांना



स्वयंसेवक लॉकडाऊन काळात ड्रीम ग्रोव्ह येथे रोपणी करतांना

शेतकऱ्यांच्या प्रयत्नाविषयी सहानुभूती वाटून त्यांच्या प्रयत्नाचे कौतुक करण्यास मदत मिळते. ते स्थानिक हवामान, उत्पादनावर कसा परिणाम करतात ते समजून घेऊन मालाची गुणवत्ता व किंमत यात होणारा बदल स्वीकारण्यास तयार असतात. दोन्ही पक्षांमध्ये निर्माण झालेल्या संबंधामुळे ते एकमेकांचे समाधान करण्यासाठी जास्त प्रयत्न करण्यास तयार असतात. (ग्राहकांसाठी मालाची गुणवत्ता व शेतकऱ्यांसाठी वाजवी दर)

सामूहिक अनुभवांवर आधारित ग्राहकांच्यामध्ये झालेल्या संवेदनशीलतेमुळे शाश्वत शेती उपक्रमांसाठी आवश्यक असलेली मागणी आणि पाठबळ मिळू शकले. शेतकरी बाजार आणि स्वयंसेवी संस्था यांच्यातील सक्रिय सहयोग हा स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात पुरवठा साखळी सक्षम करण्याचा आणि बार्टर स्वंसेवा, वेळ, संसाधने इत्यादीद्वारे आार्थिक व्यवहारांच पर्याय शिकण्याचा एक मार्ग होऊ शकतो.

शहरी शेतीच्या संकल्पनांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी पायाभूत सुविधा किंवा संसाधने सक्षम करणे हा शहर नियोजन धोरणांच्या शिफारशीचा भाग असावा. स्थानिक शेतकऱ्यांना सक्रियपणे पाठबळ देण्यासाठी आवश्यक जागरूकता आणि नेटवर्क तयार करण्यात शहर आधारित व अन्न बगीचे महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. अशा उपक्रमांना शहर नियोजनांच्या धोरणांमध्ये स्थान असायला हवे आहे.

References :

Datta, D., & Chandrasekharan, S. (2018). **Doing to being : farming actions in a community coalesee into proenironment motivations and values.** Environmental Education Research, 24 (8), 1192-1210

Parnell, S., Ehmqvist, T., McPhearson, T., Nagendra, H., & Sorlin, S. (2018). **Introduction : Situating knowledge and action for an urban planet. The uban plancet : knowedge towards sustainable cities,** 1-16

Deborah Dutta
Senior Research Fellow,
Living Farm Incomes Project,
Institue of Rural Management Anand-388001
E-mail : deborah@irma.ac.in;
debbiehornfree@gmail.com

मराठी अनुवाद : श्री. लक्ष्मीकांत पडोळे

Source : Urban Farming Initiatives Leisa Indian - September, 2020